साप्ताहिक
# गोदावरी
परिवार

RNI Regd. No.: MAHMAR/1999/7490

सवलतीचा पोस्ट रजि.नं.-JAL/120/2022-24

* वर्ष २५ वे * अंक ४३ * सोमवार २१/१०/२०२४ * डाक २३/१०/२०२४ * पाने – ४ * किंमत २ रुपये
* year 25 * issue 43 * monday : 21 / 10 / 2024 * post Dt. 23/ 10 / 2024 * pages - 4 * price 2 Rs.



दि. २१ ऑक्टो.
राष्ट्रसंत तुकडोजी
महाराज यांची
पुण्यतिथी

# ५५ वर्षीय रूग्णाच्या टीबी असलेल्या मणक्यावर शस्त्रक्रिया

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील मेंदू व मणका विकार तज्ज्ञांचे यश

***जळगाव – जिल्ह्यातील एरंडोल तालुक्यातील एका ५५ वर्षीय रूग्णाच्या टिबी असलेल्या मणक्यावर डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयातील मेंदू व मणका विकार तज्ज्ञांनी केलेली शस्त्रक्रिया यशस्वी ठरली आहे. या शस्त्रक्रियेमुळे रूग्णाची प्रकृती पुर्वीप्रमाणे ठणठणीत झाली आहे.***

याबाबत माहिती अशी की, एरंडोल तालुक्यातील गोविंदा पाटील (वय ५५) या रूग्णाला महिनाभरापूर्वी पायात मुंग्या येत असल्याची जाणीव होत होती. तसेच त्यांची पाठ देखिल सतत दुखत होती. त्यांना उठता-बसता, चालता देखिल शक्य होत नव्हते. त्यांनी मणक्यांचा एमआरआय केला. त्यांनी इतर ठिकाणी दाखविले असता निदान होत नव्हते. यावेळी त्यांच्या गावातील एका व्यक्तीने त्यांना डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात जाण्याचा सल्ला दिला. अशा परीस्थितीत त्यांनी डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयात उपचारासाठी मेंदू व मणका विकार तज्ज्ञ डॉ विपूल राठोड यांची भेट घेतली. डॉ. विपूल राठोड यांनी त्यांच्या आवश्यक त्या तपासणीसह एमआरआयचा रिपोर्टचे अवलोकन केले. ३ आणि ४ क्रमांकाच्या मणक्यातील त्रासामुळे तसेच पाठीच्या कण्यावर दबाव होता. त्यामुळे त्यांचा त्रास हा दिवसेंदिवस वाढतच होता.

यावेळी डॉ. राठोड यांनी शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार गोविंदा पाटील यांच्या मणक्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. यात मणक्याच्या वर व खाली स्क्रु टाकून कण्यावरील दबाव दूर करण्यात आला. तब्बल चार तासाच्या अथक प्रयत्नानंतर ही शस्त्रक्रिया यशस्वी ठरली. या शस्त्रक्रियेसाठी डॉ. मैत्रेयी बिरादर, डॉ. श्वेता गाढवे, यांच्यासह भूलशास्त्र तज्ज्ञ डॉ. हेमंत मापारी यांनी सहकार्य केले. तसेच मणक्याचा एक तुकडा काढून तपासणीसाठी पाठविण्यात आला. त्यात टिबी असल्याचे निदान झाले. त्यावरही तातडीने उपचार सुरू करण्यात आले. मणक्याची शस्त्रक्रिया ही महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत मोफत करण्यात आली.



रुग्णासमवेत तज्ञ डॉक्टर आणि त्यांची टीम छायाचित्रात दिसत आहे. (छायाचित्र : नितीन नेवे)

सतत वजनदार कामे करणे, बैठे काम करणे यामुळे मणक्यातील रचनेत बदल होतात. परिणामी कालांतराने पायात मुंग्या येणे, पाठीच्या कण्यावर दबाव येणे अशा समस्या उद्भवतात. अशा वेळी शस्त्रक्रिया करणे हा लाभदायी पर्याय आहे. शस्त्रक्रिया न केल्यास रूग्णाचे पाय हे कायमचे निकामी होऊन रूग्ण अंथरूणाला खिळू शकतो. त्यामुळे वेळीच निदान आणि योग्य तो उपचार होणे आवश्यक आहे.

–डॉ. विपूल राठोड
मेंदू व मणका विकार तज्ज्ञ



# ५८ वर्षीय महिलेच्या गर्भपिशवीतील गाठ काढण्यात डॉक्टरांच्या प्रयत्नांना यश

## ५८ वर्षीय महिलेच्या गर्भपिशवीतील गाठ काढण्यात यश

जळगाव – जिल्ह्यातील एका ५८ वर्षीय महिलेच्या गर्भपिशवीतून गाठ काढण्याची जोखमीची शस्त्रक्रिया डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या स्त्रीरोग तज्ज्ञांमुळे यशस्वी ठरली आहे.

याबाबत माहिती अशी की, भुसावळ तालुक्यातील मीना परदेशी (वय ५८) यांच्या ओटीपोटात गेल्या १५ ते २० दिवसांपासून दुखत होते. त्यांना प्रचंड वेदना देखिल होत होत्या. पोटदुखीचा त्रास असह्य झाल्याने त्यांना डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या ठिकाणी स्त्रीरोग विभागाच्या प्रमुख डॉ. माया आर्विकर यांच्या मार्गदर्शनाखाली तज्ज्ञ डॉ. प्रिया राठोड यांनी महिला रूग्णाची आवश्यक त्या तपासणी केली असता गर्भपिशवीत १०/१२ सेंमीची गाठ असल्याचे निदान करण्यात आले. निदानानंतर त्यांच्यावर शस्त्रक्रिया करून गर्भपिशवीतील गाठ काढण्यात यश मिळविले. या शस्त्रक्रियेसाठी डॉ. हंसिया पिल्लई, डॉ. करूणेश गुप्ता यांनी सहकार्य केले.



# हिवाळ्यात दम्याकडे दुर्लक्ष करू नका!

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील तज्ज्ञांचा घ्या सल्ला

**जळगाव – दमा हा देशभरात सामान्य आजार झाला आहे. लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत प्रत्येक वर्ग त्याला बळी पडत आहे. यामुळे दम्याने त्रस्त असलेल्या लोकांना श्वास घेण्यास त्रास होऊ लागतो. त्यामुळे खोकला, धाप लागणे, छातीत दुखणे अशा अनेक समस्या उद्भवू लागतात. हिवाळ्याची चाहूल लागताच दम्याकडे दुर्लक्ष न करता डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील वैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.**



दमा हा एक फुफ्फुसाचा विकार आहे ज्यामुळे वायुमार्ग अरुंद होतो आणि अवरोधित होतो. त्यामुळे श्वास घेण्यास त्रास होतो. त्यामुळे विलंब न करता उपचार घेणे अत्यावश्यक आहे. छातीत घरघर होणे, थकवा जाणवणे, खोकला येणे, छाती गच्च वाटणे अशी दम्याची लक्षणे आहेत. दम्यावर वेळेवर उपचार न केल्यास दम्यामुळे देशात मृत्युदर वाढू शकतो. परागकण, धुलीकण, पक्ष्यांची पिसे, धूर आणि प्रदूषण हे दम्यास कारणीभूत ठरू शकतात. त्यामुळे विलंब न करता उपचार घेणे अत्यावश्यक आहे. ही लक्षणे केवळ औषधोपचारानेच नियंत्रित केली जाऊ शकतात. त्यासाठी डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयातील मेडीसीन तज्ज्ञांचा सल्ला घेऊन संभाव्य धोके टाळावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# गुडघा बदल शस्त्रक्रिया का?

गुडघा बदलण्याची शस्त्रक्रिया ज्याला नी आर्थ्रोप्लास्टी असेही म्हणतात. गुडघा आर्थ्रोप्लास्टी ही एक वैद्यकीय प्रक्रिया आहे जी खराब झालेल्या गुडघ्याच्या सांध्याला मेटल आणि प्लास्टिकच्या घटकांपासून बनवलेल्या कृत्रिम सांध्याने बदलण्यासाठी वापरली जाते.




ही शस्त्रक्रिया सामान्यत: तीव्र गुडघेदुखी कमी करण्यासाठी आणि गंभीर संधिवात किंवा सांधे दुखी असलेल्या व्यक्तींमध्ये गतिशीलता पुनर्संचयित करण्यासाठी केली जाते.
हे वेदना कमी करून आणि गतिशीलता सुधारून गंभीर संधिवात किंवा सांध्याचे नुकसान असलेल्या लोकांना मदत करते. यात संसर्गासारखे धोके असले तरी, ही एक जीवन बदलणारी प्रक्रिया आहे, ज्यामुळे अनेकांना जीवनाचा दर्जा चांगला मिळतो.

*हे का केले जाते?*

*गुडघा बदलण्याची शस्त्रक्रिया हा सामान्यतः दैनंदिन क्रियाकलापांमध्ये गुडघेदुखी आणि कडकपणाचा अनुभव घेत असलेल्या लोकांसाठी पहिला पर्याय नाही जसे की पायऱ्या चढणे, चालणे किंवा खाली बसणे. औषधोपचार, शारीरिक उपचार आणि इंजेक्शन्स यांसारख्या इतर उपचारांनी पुरेसा आराम मिळत नाही तेव्हा हा सामान्यतः शेवटचा पर्याय मानला जातो . गुडघा बदलण्याच्या शस्त्रक्रियेच्या सामान्य कारणांमध्ये ऑस्टियोआर्थरायटिस, संधिवात आणि पोस्ट-ट्रॉमॅटिक आर्थरायटिस यांचा समावेश होतो. गुडघ्याचे खरा झालेले भाग कृत्रिम घटकांसह बदलून, प्रक्रियेचा उद्देश लोकांना अधिक मुक्तपणे हालचाल करण्यात आणि चांगल्या दर्जाच्या जीवनाचा आनंद घेण्यास मदत करणे आहे.*

# २९ वर्षीय युवतीच्या हृदयावरील छिद्रावर यशस्वी शस्त्रक्रिया

## डॉ.उल्हास पाटील रूग्णालयाच्या हृदयरोग डॉक्टरांचे कौतुक

**जळगाव – हृदयाच्या छिद्रावर शस्त्रक्रिया करणे अत्यंत कठीण काम असते, कारण अशावेळी त्यांच्या जीवाला जास्त धोका असतो, मात्र तरूणीसाठी डॉक्टरांनी देवदूतासारखी भूमिका निभावत ही किमया करून दाखवली आहे.**



२९ वर्षीय युवतीच्या हृदयावरील छीद्रावर यशस्वी शस्त्रक्रिया करून जीवनदान देणार्या डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या कॉर्डिओलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. वैभव पाटील, डॉ. हार्दिक मोरे, डॉ.मोहीत, डॉ.निखील यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### युवतीच्या हृदयाला २२ मि.मि. चे छिद्र होते

जळगावातील रहिवाशी या २९ वर्षीय युवतीला श्वास घेण्यास त्रास आणि धाप लागत असल्याचे निदर्शनास आले, त्यानंतर त्यांनी विविध ठीकाणी चाचण्या केल्या त्यावेळी या युवतीच्या हृदयाला २२ मि.मि. आकाराचे छिद्र असल्याचे निदर्शनास आले. त्यांनी डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय रुग्णालयात डॉ हार्दिक मोरे यांचेशी संपर्क साधाला. त्यांनी युवतीला दाखल करण्यास सांगितले व ट्रान्सकॅथेटर प्रक्रिया राबवून ही यशस्वी शस्त्रक्रिया केली. शस्त्रक्रियेनंतर युवतीच्या प्रकृतीत सुधारणा होत असून युवतीच्या आहार आणि हृदयप्रक्रिया व्यवस्थित होत असल्याचे दिसून आले आहे. डॉ.हार्दिक मोरे व डॉक्टर्सच्या टीमने अवघड शस्त्रकिया यशस्वी करुन बाळाला नवजीवन दिल्याबद्दल अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## संपादकीय

# अनमोल 'रतन'

ध्येयवादी आणि निश्चयी टाटांची उद्योग जगतातील कारकीर्द दोन दशकांहून अधिक काळाची! त्यांच्या कारकिर्दीत टाटा उद्योग समूहाने प्रगतीची मोठी गरूडझेप घेतली. यशाची अनेक शिखरे पादाक्रांत केली. जगातील शंभर देशांत टाटा उद्योग समूहाचा विस्तार केला. अनेक युरोपियन कंपन्या खरेदी करून त्यांनी टाटा समूहात आणल्या. टाटा समूहाला वैश्विक चेहरा प्राप्त करून दिला. जेवणाचा स्वाद वाढवणार्या मिठापासून लहान-मोठ्या वाहननिर्मितीत टाटा समूहाने पाऊल ठेवून ते यशस्वी केले. रतन टाटा हे भारतीय उद्योग क्षेत्राचा प्रमुख चेहरा होते. 'टाटा' या नावाला त्यांनी गुणवत्ता आणि विश्वासाचे प्रतीक बनवले. उद्योग समूहात कौटुंबिक आपलेपणा आणला. 'टाटा' नाव आज गावोगावी आणि खेडोपाडी पोहोचले आहे. ही किमया रतन टाटांनी आपल्या कुशल नेतृत्वाने घडवली. टाटा उद्योग समूहाला जागतिक उंचीवर नेताना भारताच्या औद्योगिक विकासातही भरीव योगदान दिले. एखाद्या उद्योजकाला जनसामान्यांचे भरभरून प्रेम मिळणे ही तशी दुर्मिळ गोष्ट! टाटांना जनसामान्यांचे प्रेम भरभरून मिळाले. स्वप्न पाहणे हा मानवी स्वभाव आहे. सामान्य माणसे स्वत:च्या आणि कुटुंबाच्या उज्वल भविष्याची स्वप्ने पाहतात. रतन टाटांनादेखील मोठी स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्णत्वास नेण्याची आवड होती. मोठ्या स्वप्नांबरोबरच सामान्यांच्या स्वप्नांचीही त्यांना जाणीव होती. मध्यमवर्गीयांना स्वत:च्या कारमधून फिरता यावे, कार खरेदी त्यांच्या आवाक्यात यावी व कारचे त्यांचे स्वप्न पूर्ण व्हावे म्हणून एक लाखातील 'नॅनो' कारचे मानवतावादी स्वप्न टाटांनी पाहिले आणि वास्तवात उतरवले. नॅनो प्रकल्प उभारताना त्यांनी फायद्या-तोट्याचे गणित पाहिले नाही. मध्यमवर्गीयांच्या चेहर्यावरील आनंद त्यांच्यासाठी जास्त महत्त्वाचा होता. उद्योगनगरी मुंबईच्या कुशीत जन्मलेल्या रतन टाटांचे व्यक्तिमत्त्व शांत, संयमी, धाडसी, प्रेमळ आणि सदैव हसतमुख होते. मोठ्या उद्योग समूहाचा भार ते पेलत असले तरी त्याचा ताण त्यांच्या चेहर्यावर कधी जाणवत नसे. ख्यातनाम उद्योगपती असूनही सर्वसामान्य जीवन जगणे त्यांनी पसंत केले. दुमजली घरात राहून त्यांनी कामकाज केले. समूहातील सेवकांशी त्यांचा व्यवहार आपुलकीचा होता. शिपाई, वाहनचालक यांनाही ते आदराने वागवत. मुक्या प्राण्यांवर त्यांचे निस्सिम प्रेम होते. 'बॉम्बे हाऊस' हे टाटा उद्योग समूहाचे मुख्यालय! रतन टाटा तेथे जात तेव्हा त्यांच्या स्वागतासाठी कोणतीही धावपळ होत नसे. त्यांच्या येण्याचा सार्वधिक आनंद त्यांच्या प्रिय श्वानांना होत असे. आपण जागतिक ख्यातीचे उद्योगपती आहोत, हा अभिनिवेश न बाळगता ते श्वानांना प्रेमाने कुरवाळत. कोण काय म्हणेल याची त्यांना अजिबात फिकीर नसे. उद्योगात जोखीम स्वीकारायला ते सदैव सज्ज असत. समाजातून मिळवलेले समाजाला परत केले पाहिजे, असा त्यांचा प्रगल्भ विचार होता. तो त्यांनी कृतीत उतरवला.

# सर्व समाज समावेशक कुमारी सन्मान व पूजन

**जळगाव: भाजपा महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. केतकीताई पाटील यांनी या नवरात्रीमध्ये सर्व समाज समावेशक कुमारीका सन्मान व पूजनाच्या आयोजन करून चांगला पायंडा घालून देण्याचा प्रयत्न केला आहे.**

नवरात्र उत्सवामध्ये बालिका पूजनाला फार महत्त्व आहे. हाच धागा धरून डॉ. केतकिताई पाटील यांनी सर्व समाजातील कुमारीकांना सन्मान देणे, मिष्टान्न भोजन, शालेय उपयोगी साहित्य आणि शृंगार साहित्य उपहार म्हणून देण्याचा उपक्रम राबवला. मुलींमध्ये शिक्षणाची ओढ निर्माण व्हावी, समाज बांधवांचे सामाजिक वीण अधिक घट्ट व्हावी यासाठी हा प्रयत्न केला गेला.

हा उपक्रम राबवताना जुने जळगाव मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगरातील बाल भीम व्यायाम शाळा मित्र मंडळाच्या सहकार्याने डॉ बाबासाहेब आंबेडकर समाज मंदिर येथे, शेंदुर्णी येथे आई रेणुकाई मित्र मंडळ, वनदेव दत्त मंदिर वाडी दरवाजा, चोपडा येथे श्याम भाऊ गुजराती यांच्या सहकार्याने, पूनखेडा तालुका रावेर येथे तेथील सार्वजनिक नवदुर्गा उत्सव मंडळाच्या सहकार्याने दुर्गादेवीच्या मंदिरात, भुसावळ येथे प्रतीक्षा महिला मंडळाच्या सहकार्याने संतोषी माता बहुउद्देशीय सभागृहात, यावल तालुक्यातील आसराबारी व वड्री धरण येथील आदिवासी पाडे येथे सरपंच अजय भालेराव यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबवण्यात आला.

या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक झाले असून सुदृढ आणि निकोप समाज निर्मितीसाठी असे उपक्रम राबवले जाणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन अनेक मान्यवरांनी केले आहेत. हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी भाजपाचे पदाधिकारी, समाजसेवक, माजी नगरसेवक, दुर्गा उत्सव मंडळे, ग्रामस्थ आणि त्या त्या ठिकाणी च्या स्थानिकांचे सहकार्य लाभले.



एखाद्या राजकीय पक्षाच्या महिला मोर्चाच्या पदाधिकाऱ्याकडून राज्यातील पहिलाच असा उपक्रम राबविला गेला असावा. या उपक्रमाच्या माध्यमातून सामाजिकता जोपासण्याचा प्रयत्न झाला. त्यास सकारात्मक प्रतिसाद लाभला आहे. ५०० पेक्षा अधिक कुमारिकांना दिला उपहार.

# खान्देश गणेश मित्र मंडळ विवरे बु. येथे ७१ दात्यांनी केले रक्तदान

खान्देश गणेश मित्र मंडळ विवरे बु., ता. रावेर येथे ७१ रक्तदात्यांनी केले.

रक्तदान उपस्थित मान्यवर गोदावरी फाउंडेशन संचालिका डॉ.सौ केतकीताई पाटील. हर्षल बोरोले, गणेश तळेले, लितेश राणे, कुंदन राणे, भूषण वासनकर, रोहन चौधरी, हर्षल तळेले, विपीन राणे, राहुल पाचपांडे, पंकज बेंडाळे, अजय फेगडे, महेश ढोपे, विनोद फेगडे, सिद्धेश राणे, विवेक बेंडाळे, रवींद्र फेगडे, तुळशी फेगडे, तुरुंग फेगडे. , रुपेश झोपे , सोजल राणे , प्रीतम सरोदे , गोदावरी रक्तपेढीचे डॉ.नितीन भारंबे, रक्तपेढी समन्वयक लक्ष्मण पाटील टेक्निशियन सईद शेख., यश पाटील भावी शेळके यांनी घेतले परिश्रम.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी खान्देश गणेश मित्र मंडळ विवरे बु. च्या कार्यकर्त्यांनी, परिसरातील नागरिकांनी विशेष सहकार्य केले व परिश्रम घेतले.



# नवरात्रौत्सवात विविध गरबा, दांडिया स्पर्धा उत्साहात



## डॉ. वर्षा पाटील वूमन्स कॉलेज ऑफ कॉम्पुटर

गोदावरी फाऊंडेशन संचालित डॉ. वर्षा पाटील वूमन्स कॉलेज ऑफ कॉम्पुटर ॲप्लिकेशन महाविद्यालयात रास-दांडिया २०२४ उत्साहात पार पडला. नवरात्रोत्सवात महाविद्यालयाच्या आवारात रास-दांडिया घेण्यात आला. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.नीलिमा वारके यांनी कार्यक्रमाची सुरवात देवीच्या प्रतिमेस पुष्पहार, श्रीफळ अर्पण करून केली.या कार्यक्रमात महाविद्यालयाच्या बी.सी.ए. च्या विद्याथिनींनी भाग घेतला. विद्याथिनींनी पारंपारीक वेश धारण केलेला होता. यावेळी दांडिया क्वीन, बेस्ट ड्रेस इत्यादी साठी विद्याथिनींना पारितोषिक देण्यात आले. महाविद्यालयाच्या रॉक गार्डन मध्ये संध्याकाळी हा कार्यक्रम रंगला. विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक अशा बहारदार गाण्यांवर गरब्याच्या ताली खेळल्या. यावेळी दांडिया क्वीन शितल टेंमकर, श्रद्धा तोमर, गरबा क्वीन निधि पाटिल या विद्याथिनींनी स्पर्धेमध्ये बक्षिसे पटकावली.संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन प्रा. स्मिता चौधरी यांनी पाहिले. या कार्यक्रमास सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालय

गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयात दिनांक ३ ऑक्टोबर ते ११ ऑक्टोबर २०२४ पर्यंत नवरात्री उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. घटस्थापनेच्या दिवशी महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यासाठी गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील सर, सचिव डॉ. वर्षा पाटील मॅडम, सौ अलका पाटील मॅडम तसेच त्यांच्यासोबत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील डॉ. ईश्वर जाधव (रजिस्ट्रार) , सर्व शाखाप्रमुख, प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी वर्ग अधिक संख्येने उपस्थित होते. मान्यवरांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. नवरात्री उत्सवामध्ये विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्यासाठी वेगवेगळ्या इव्हेंटचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात दांडिया, गरबा, यांचा समावेश आहे. नऊ दिवस चालणाऱ्या या उत्सवांमध्ये विद्यार्थ्यांसाठी बेस्ट दांडिया कपल, बेस्ट दांडिया, बेस्ट गरबा, बेस्ट ड्रेस या स्पर्धांच्या माध्यमातून विविध पारितोषिके ठेवण्यात आलेली होती. विजेते स्पर्धक पुढील प्रमाणे दांडिया,पायल सूर्यवंशी,मानसी चौधरी,गणेश कोलते, गरबा डिंकी शदानी,वैष्णवी सोनवणे,प्रतीक जाधव,कॉस्ट्यूम सानिका राजकुळे,स्वामी पवार,कपल दांडिया जानवी बोरसे व पल्लवी पखाले ,यश नारखेडे व डिंपल,ग्रुप गरबाइबीट ब्रेकर्स,इ टीसी स्कॉड नियोजन प्रा. नकुल गाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. त्यांच्यासोबत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.





## सावदा इंग्लिश स्कूल

**सावदा - येथील गोदावरी फॉउंडेशन संचलित डॉ. उल्हास पाटील इंग्लिश मीडियम सी बी एस इ स्कूल सावदा येथे शारदीय नवरात्रोत्सवानिमीत्त गरबा दांडीयाचे आयोजन करण्यात आले होते.सर्व प्रथम माता दुर्गेची आरती प्रिन्सीपल भारती महाजन यांचे हस्ते करण्यात आली.**

आकर्षक सजावट तसेच गरबा दांडियाचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सचिन भिडे यांनी दिले. विद्यार्थी ,शिक्षक, पालक वर्गाने मोठ्या उत्साहाने गरबा दांडियाच्या प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाचा आनंद अनुभवत होते . इयत्ता सहावी ते दहावीचे विद्यार्थी अतिशय उत्कृष्ट रीतीने डीजेच्या संगीतावर गरबा दांडियाचा आनंद घेताना दिसून आले. अभ्यासाबरोबरच सांस्कृतिक अध्यात्मिक मूल्यांची रुजवणूक करण्याचे महत्त्वाचे कार्य शाळा करीत आहे . कार्यक्रमाला माजी खा.डॉ. उल्हास पाटील, डॉ. वर्षा पाटील,डॉ. अनिकेत पाटील, डॉ वैभव पाटील यांची उपस्थीती होती. यशस्वीतेसाठी शाळेच्या प्रिन्सीपल भारती महाजन यांच्या मार्गदर्शनानुसार कलाशिक्षक उमेश बढे, कांचन शिक्षीका, खिलेश शिक्षक यांनी परिश्रम घेतले.

Editor : Subhash Patil (Reg. Newspaper) Weekly Godavari Parivar : Owner, Publisher, Printer : Dr. Mrs. Varsha Patil printed at Subhash Printers, 38, Trimbak Nagar, Near Shakuntala Rane Primary School, Beside Narayani Park Apartment, Mahabal Area, Jalgaon 425002 (Mah.) Godavari Hospital, Released at Jalgaon, Near Bhaskar Market. Phone no. 2221834/35, should be sent to this email for publication of news in the issue (Editors do not necessarily agree with the views published in the issue.)

संपादक : सुभाष पाटील (रजि. न्युजपेपर) साप्ताहिक गोदावरी परिवार : मालक, प्रकाशक, मुद्रक : डॉ. सौ. वर्षा पाटील यांनी सुभाष प्रिंटर्स, ३८, त्र्यंबक नगर, शकुंतला राणे प्रायमरी स्कूलजवळ, नारायणी पार्क अपार्टमेंट शेजारी, महाबळ एरिया, जळगांव ४२५००२ (महा.) येथे छापून गोदावरी हॉस्पीटल, भास्कर मार्केट जवळ, जळगांव येथे प्रसिद्ध केले. फोन नं. २२२१८३४/३५, अंकात बातम्या प्रसिद्ध करण्यासाठी या ईमेलवर पाठवाव्यात Email : godavari.parivar@gmail.com (अंकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंग महाविद्यालयात राष्ट्रीय परिषदेचा समारोप

**जळगाव – गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंगतर्फे नाविन्यपूर्ण नर्सिंग शिक्षणातील सुधारणा आणि क्लिनिकल प्रॅक्टिसमध्ये उत्कृष्टता या विषयावर आयोजित राष्ट्रीय परिषदेचे गुरूवारी मान्यवरांच्या हस्ते थाटात उद्‌घाटन करण्यात आले तर शुक्रवारी समारोपक करण्यात आला. दरम्यान दोन दिवसीय परिषदेसाठी महाराष्ट्रासह विविध राज्यातील ५५० प्रतिनीधींची उपस्थिती लाभली होती.**

गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंगतर्फे ब्रिजिंग द गॅप: नाविन्यपूर्ण नर्सिंग शिक्षणातील सुधारणा आणि क्लिनिकल प्रॅक्टिसमध्ये उत्कृष्टता या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. परिषदेच्या सुरूवातीला संस्थेचे अध्यक्ष माजी खा. डॉ. उल्हास पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून उद्‌घाटन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख वक्ते डॉ. आय. क्लेमेंट (बंगळुरू), डॉ. लॅरिसा मातरा (बंगळुरू), डॉ. जमुना राणी(पश्चिम बंगाल), डॉ. रीटा लखानी (मुंबई), डॉ. रवींद्र एच. एन.(गुजराथ), डॉ. नेस I सत्या (मंगळुरू), डॉ. मोहम्मद हुसेन (नाशिक), वैद्यकीय महाविद्यालयाचे अधीष्ठाता डॉ. प्रशांत सोळंके, प्राचार्या विशाखा गणवीर आदी मान्यवर उपस्थित होते. प्राचार्या विशाखा गणवीर यांनी परिषदेच्या थीमबाबत माहिती दिली. तसेच वैद्यकीय महाविद्यालयाचे अधीष्ठाता यांनी परिषदेचा उद्देशाबाबत नर्सिंग शिक्षण आणि क्लिनिकल प्रॅक्टिसमध्ये सुधारणा करण्यासाठी नवीन दृष्टिकोन आणि अनुभवांची देवाणघेवाण करणे असे सांगितले.पहिल्या दिवशी सत्रांमध्ये नर्सिंग शिक्षणातील नवीन पद्धती, तंत्रज्ञानाचा वापर आणि सैद्धांतिक व प्रायोगिक प्रशिक्षणामधील अंतर कमी करण्याबाबत चर्चा केली गेली.

## दोन दिवसीय परिषदेसाठी देशभरातील ५५० प्रतिनिधींची उपस्थिती




परिषदेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच दि. ११ रोजी महत्त्वपूर्ण पॅनेल चर्चेचे आयोजन करण्यात आले,ज्यात नर्सिंग शिक्षणाच्या आव्हानांवर आणि भारतातील भविष्यातील दिशांवर चर्चा झाली. या पॅनेलमध्ये डॉ. अन्सी रमेश, डॉ. मिलिंद काळे, डॉ. विश्वनाथ बिरादार, डॉ. शिवचरन सिंग या मान्यवरांचा सहभाग होता. ही पॅनेल चर्चा प्रा. स्वप्नील रहाणे यांच्या संयोजनाखाली झाली. चर्चा अत्यंत ज्ञानवर्धक होती

या कार्यक्रमाला डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंग महाविद्यालयाचे विभागप्रमुख प्रा. अश्विनी वैद्य, प्रा. जसिंथ दया, प्रा. मनोरमा कश्यप, प्रा. पियुष बाघ यांची उपस्थिती होती. या परिषदेच्या आयोजनासाठी प्राचार्य विशाखा गणवीर आणि महाविद्यालयाचे व्यवस्थापक प्रवीण कोल्हे यांनी विशेष सहकार्य केले आहे. आयोजकांनी नर्सिंग शिक्षणात नाविन्यपूर्ण बदल घडवण्याचे ध्येय ठेऊन हे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. परिषदेचे सुत्रसंचालन प्रा. निम्मी वर्गीस यांनी तर आभार प्रा. जसिंथ दया यांनी मानले. यशस्वीतेसाठी समन्वयक जयश्री जाधव, गिरीश खडसे, सचिन पवार, स्वाती गाडेगोने, समृध्दी अवसारे, स्मीता पांडे, तांत्रिक टीम निर्भय मोहोड, रश्मी टेंभूर्णे, प्रशिक चव्हाण, साउंड कमिटी अभिजीत राठोड, भुषण चौधरी, आबिद पठाण, फुड कमिटी प्रियंका गवई, प्रिती गायकवाड, अस्मिता जुमडे, सुमित निर्मल हयांनी परिश्रम घेतले.

# गोदावरी स्कूलचे क्रीडा स्पर्धेत यश

जळगाव – गोदावरी इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्रियदर्शनी त्रिपाठी हिने जिल्हा राइफल शूटिंग तर लाव्या प्रशांत विरनारे यांने जिल्हास्तरीय शालेय ऍथलेटिक्स स्पर्धेत २ सुर्वण पदक प्राप्त करत यश मिळवले आहे.या दोघांची विभागीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

स्पर्धेमध्ये स्कूलची प्रियदर्शनी त्रिपाठी याने १४ वर्षा आतील १० मीटर ओपन साईड राइफल शूटिंग स्पर्धेत सर्वात जास्त १४१ गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक पटकाविला व सुवर्ण पदक प्राप्त केले तर गोदावरी स्कुलचा खेळाडू लाव्या यांने २०० मी धावणे, उंच उडी या स्पर्धेत सुर्वण पदक प्राप्त केले आहे. त्यांच्या कामगीरी मूळे नाशिक येथे शालेय विभागीय स्पर्धेसाठी त्यांची निवड करण्यात आली असून यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी खा. डॉ. उल्हास पाटील, उपाध्यक्ष सुभाष पाटील, सचिव डॉ.वर्षा पाटील, सदस्या डॉ. केतकी पाटील, हृदयरोग तज्ञ डॉ. वैभव पाटील यांचेसह शाळेच्या प्रिन्सीपल निलीमा चौधरी व शिक्षकांनी अभिनंदन केले. त्याला प्रशिक्षक आसिफ खान व पकज तिवारी यांचे मार्गदर्शन लाभले.



# डॉ.उल्हास पाटील यांच्या हस्ते बायोमेडीकल विभागात शस्त्रसाहित्य पूजन

**जळगाव : येथील डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयातील बायोमेडीकल विभागातर्फे विजयादशमीच्या पार्श्वभूमीवर माजी खा. डॉ. उल्हास पाटील यांच्या हस्ते शस्त्रसाहीत्य पूजन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. उल्हास पाटील यांनी बायोमेडीकल विभागाची पाहणी करून स्टाफशी विविध विषयांवर चर्चा केली.**

बायोमेडीकल विभाग हा रूग्णालयातील अत्यंत महत्वाचा विभाग आहे. या विभागामार्फत रूग्णालयातील साहीत्यांची दुरूस्ती, देखभाल केली जाते. विजया दशमीच्या पार्श्वभूमीवर बायोमेडीकल विभागात माजी खा. डॉ. उल्हास पाटील यांच्या हस्ते शस्त्रसाहित्याचे पूजन करण्यात आले.

यावेळी डी.एम. कार्डिओलॉजिस्ट डॉ. वैभव पाटील, वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रेमचंद पंडित, गोदावरी अभियांत्रिकीचे शैक्षणिक अधिष्ठाता प्रा. ईश्वर जाधव, प्रशासकीय अधिकारी एन.जी. चौधरी, विभागाचे संचालक प्रा. विजय व्ही. चौधरी, बायोमेडीकल सर्विस इंजिनीअर अनिल महाजन, प्रदीप पालवे, पूनम चौधरी, संतोष माने आदी उपस्थित होते. बायोमेडीकल विभाग हा वैद्यकीय



रूग्णालयातील अत्यंत महत्वाचा विभाग असल्याचे माजी खा. डॉ. उल्हास पाटील यांनी सांगितले. तसेच याप्रसंगी विभागाची पाहणी करून विविध साहीत्यांची माहिती देखिल डॉ. उल्हास पाटील यांनी जाणून घेतली.

# रतनजी टाटांना औद्योगिक क्षेत्रातर्फे आदरांजली

**जळगाव – पद्मविभूषण रतन टाटा यांचे ९ ऑक्टोबर २०२४ रोजी रात्री दुःखद निधन झाले स्वातंत्र्यपूर्व काळापासून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवापर्यंत देशाची अनेक स्थित्यंतरे अनुभवलेले, नैतिकता व विश्वासार्हतेचे प्रतीक असलेले ऋषितुल्य व्यक्तिमत्व आता काळाच्या पडद्याआड गेलेले आहे.अशा या भारत मातेच्या थोर सुपुत्रास श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी जळगाव औद्योगिक क्षेत्रातर्फे श्रद्धांजली सभेचे आयोजन गोदावरी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च च्या सभागृहात करण्यात आलेले होते.**



प्रास्ताविक गोदावरी आय एम आर चे संचालक डॉ प्रशांत वारके यांनी केले याप्रसंगी जळगाव एमआयडीसी मधील विविध उद्योगांमधील सुमारे २०० पेक्षा जास्त उद्योजक उपस्थित होते सर्वप्रथम आदरांजली वाहताना एमआयडीसीचे रिजनल ऑफिसर श्री सुनील घाटे यांनी रतनजींच्या आठवणींना उजाळा दिला त्यानंतर लघुउद्योग भारती जळगाव चे अध्यक्ष संतोष इंगळे, जिंदा असोसिएशन जळगाव चे अध्यक्ष रवी लढ्ढा, एम सेक्टर उद्योजक चॅरिटेबल ट्रस्ट चे अध्यक्ष उमेश महाजन तसेच स्मॉल स्केल इंडस्ट्रियल असोसिएशन चे अध्यक्ष चंद्रकांत बेंडाळे व श्याम अग्रवाल, जळगाव मॅट मॅन्युफॅक्चरर असोसिएशन चे अध्यक्ष महेंद्र रायसोनी, लेवा चेंबर ऑफ कॉमर्स व ग्रीकल्चर चे अध्यक्ष नितीन इंगळे, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स व प्लास्टिक रिप्रोसेसिंग असोसिएशन चे विनोद बियाणी पीव्हीसी पाईप मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशनचे श्री कवर लालजी संघवी, लेवा महासंघाचे अध्यक्ष श्री अरुण बोरोले, रोटरी क्लब जळगाव इलाईट चे अध्यक्ष ओम प्रकाश सिंग, विश्व हिंदू परिषदेचे विभागीय प्रमुख श्री भावसार तसेच श्री हरीश मुंदडा या सर्व मान्यवरांनी शब्द सुमनांनी श्रद्धांजली अर्पण केली. कार्यक्रमाच्या शेवटी गोदावरी फाउंडेशनच्या सचिव डॉक्टर वर्षा पाटील यांनी रतन टाटा यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू कथन केलेत. आदरणीय रतन टाटांना शेवटी सर्व उद्योजकांनी गुलाब पुष्प वाहून श्रद्धांजली अर्पण केली व भारताच्या या औद्योगिक महानायकाला जळगाव औद्योगिक क्षेत्रात तर्फे वंदना देण्यात आली.



**प्रेमबोल**

**डॉ. प्रेमचंद पंडित**
(९४२२९१५३७९)
(निवृत्त सिव्हील सर्जन, बुलडाणा)
वैद्यकीय अधीक्षक
डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव

1. **Understand the root of your behaviors and actions.**
 – ✽अपने व्यवहारों और क्रियाओं की जड़ को समझें।✽
2. ***Feel confident regulating your emotions before reacting.***
 – ✽प्रतिक्रिया देने से पहले अपनी भावनाओं को नियंत्रित करने में आत्मविश्वास महसूस करें।✽
3. ***Evaluate what you focus your energy on.***
 – ✽मूल्यांकन करें कि आप अपनी ऊर्जा कहां केंद्रित करते हैं।✽
4. ***Every morning, think of one thing in your life, that you are appreciative of.***
 – ✽हर सुबह, अपने जीवन में एक चीज के बारे में सोचें, जिसकी आप सराहना करते हैं।✽

# गोदावरी आयएमआर महाविद्यालयात रास-दांडिया



**जळगाव – गोदावरी फाऊंडेशन संचालित गोदावरी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च जळगाव महाविद्यालयात रास-दांडिया २०२४ उत्साहात पार पडला.**

नवरात्रोत्सवात महाविद्यालयाच्या आवारात रास-दांडिया घेण्यात आला. महाविद्यालयाचे संचालक डॉ. प्रशांत वारके यांनी कार्यक्रमाची सुरवात देवीच्या प्रतिमेस पुष्पहार, श्रीफळ अर्पण करून केली. महाविद्यालयाच्या रॉक गार्डन मध्ये संध्याकाळी हा कार्यक्रम रंगला. विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक अशा बहारदार गाण्यांवर गरब्याच्या ताली खेळल्या. बी.बी.ए, बी.सी.ए, एम.बी.ए च्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला. विद्यार्थ्यांनी पारंपारीक वेश धारण केलेला होता. यावेळी दांडिया किंग, दांडिया क्वीन, बेस्ट दांडिया कपल, बेस्ट ड्रेस इत्यादी साठी विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले. यावेळी दांडिया किंग प्रेम नाले ,, दांडिया क्वीन कोमल भोळे, गरबा क्वीन भूमिका नाले , गरबा किंग विश्वजीत यां विद्यार्थ्यांनी स्पर्धेमध्ये बक्षिसे पटकावली. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन प्रा. स्मिता चौधरी यांनी पाहिले. या कार्यक्रमास सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

# गोदावरी अभियांत्रिकीत प्रशिक्षण, प्लेसमेंट कौशल्यवर मार्गदर्शन

**जळगाव – येथील गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रशिक्षण व प्लेसमेंट कौशल्येवर संगणक अभियांत्रिकी विभागाने उज्ज्वल करिअर संधींसाठी प्रशिक्षण आणि प्लेसमेंट कौशल्ये वृद्धिंगत करणे: या विषयावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन आयोजित केले.**

या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक २०१० बॅचचे माजी विद्यार्थी श्री. आकाश शेलार (एचडीएफसी असिस्टंट व्हाइस प्रेसिडेंट), महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील, प्रा. निलेश वाणी (संगणक विभाग प्रमुख), डॉ. विजयकुमार वानखेडे, (प्रशिक्षण आणि प्लेसमेंट अधिकारी) प्रा. किशोर महाजन (ल्युमिनी असोसिएशन), सर्व प्राध्यापक वर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते.आलेल्या मान्यवरांचे डॉ. विजयकुमार पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.



कार्यक्रमाची सुरुवातीला प्रा. वेलचंद होले यांनी प्रास्ताविकात,प्लेसमेंटसाठी विभागाच्या पुढील योजना मांडल्या. विभागप्रमुख प्रा. निलेश वाणी यांनी उपक्रमांचे सविस्तर वर्णन करत विद्यार्थ्यांच्या यशस्वी प्लेसमेंटसाठी होणाऱ्या प्रयत्नांवर भर दिला. आकाश शेलार यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना सॉफ्ट स्किल्स, संवाद कौशल्य, नेतृत्वगुण आणि परिस्थितीनुसार जुळवून घेण्याच्या क्षमतेच्या महत्त्वावर मार्गदर्शन केले. विद्यार्थी तसेच असतानाच सर्व गुणवैशिष्ट्ये आत्मसात करण्याबद्दल आवाहन केले जेणेकरून बाहेरील जगात वावरताना या सर्व गोष्टींचा फायदा तुम्हाला होईल.डॉ. विजयकुमार वानखेडे, (प्रशिक्षण आणि प्लेसमेंट अधिकारी), यांनी प्रत्येक विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या करिअरच्या आकांक्षा व अपेक्षा जाणून घेतल्या आणि त्यांना योग्य मार्गदर्शन दिले. शेवटी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांनी विद्यार्थ्यांना प्रत्येक संधीचा फायदा घ्यावा असे प्रोत्साहिते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन द्वितीय वर्षातील संगणक अभियांत्रिकीच्या विद्यार्थिनी डिंकी शादानी आणि हेमांगी बावा यांनी केले, आयोजनाबद्दल गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील, डॉ. वर्षा पाटील (सचिव), डॉ.केतकी पाटील(सदस्य) व डॉ. वैभव पाटील (डीएम कार्डिओलॉजी) यांनी कौतुक केले.

# जागतिक शरिररचना शास्त्र दिनानिमित्त पोस्टर व रांगोळी स्पर्धा उत्साहात

## डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील शरिररचना शास्त्र विभागाचा उपक्रम

**जळगाव – डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात मंगळवार दिनांक १५ ऑक्टोबर रोजी असलेल्या जागतिक शरीर रचना शास्त्र दिनानिमित्त शरीररचना शास्त्र विभागाने पोस्टर व रांगोळी मेकिंग स्पर्धा आयोजित केली होती.**

यात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयातील शरीररचना शास्त्र विषयाच्या प्राध्यापिका डॉ. शुभांगी घुले यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा उत्साहात पार पडली. यात व्दितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. पोस्टर व रांगोळी मेकिंग स्पर्धे त विद्यार्थ्यांनी मानवी शरितातील विविध



अवयव, हाडे याशिवाय आतड्यांची रचना आर्दिचे चित्र रेखाटले.परिक्षक म्हणून डॉ दिलीप ढेकळे, डॉ अनंत बेंडाळे, डॉ. कैलास वाघ यांनी काम पाहीले. यावेळी वसंतदादा पवार वैद्यकिय महाविद्यालयाचे अधिष्टाता डॉ सुधीर भामरे, शासकिय वैद्यकिय महाविद्यालय संभाजीनगर मेडिसिन विभागप्रमुख डॉ. मिनाक्षी भटाचार्य, संस्थेचे अध्यक्ष माजी खा. डॉ.उल्हास पाटील, सदस्य डी एम कॉर्डीओलॉजीस्ट डॉ.वैभव पाटील,वैद्यकिय महाविद्यालयाचे संचालक डॉ.एन.एस.आर्विकर, अधिष्टाता डॉ. प्रशांत सोळंके, शरिररचना शास्त्र विभाग प्रमुख डॉ.अमृत महाजन,प्रा.डॉ.शुभांगी घुले,यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. डॉ सुधिर भामरे, डॉ मिनाक्षी भटटाचार्य यांनी अनमोल मार्गदर्शन करीत उपक्रमाचे कौतुक केले. या स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा नुकताच पार पडला समारोप प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. याप्रसंगी डॉ. प्रिती सोळंके, डॉ.झमीर अहमद, डॉ.पूनम, डॉ.रघुराज यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख, टिचिंग–नॉन टिचिंग स्टाफ उपस्थीत होता.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार राजनंदीनी पाटील,अमीत पाटील यांनी केले. यशस्वीतेसाठी शरीररचना विभागाचे प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा यांनी परिश्रम घेतले.




प्रथम क्रमांक विजेता रांगोळी

### डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात

# जागतिक भूल दिन साजरा

**जळगाव – येथील डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयात जागतिक भूल दिनानिमीत्त चेअरमन डॉ. उल्हास पाटील यांच्या हस्ते केक कापण्यात आला.**

जागतिक भूल दिन हा जागतिक आरोग्य सेवा कार्यक्रम आहे जो दरवर्षी १६ ऑक्टोबर रोजी औषधोपचारात भूल देण्याच्या महत्त्वाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी साजरा केला जातो. डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात शस्त्रक्रिया विभागात माजी खा. डॉ. उल्हास पाटील यांच्या हस्ते केक कापण्यात आला. यावेळी वैद्यकीय महाविद्यालयाचे अधीष्ठाता डॉ. प्रशांत सोळंके, वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रेमकुमार पंडीत, भूलशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ.अभिनय हरणखेडकर, डॉ.काशिनाथ



महाजन, डॉ. देवेंद्र चौधरी, डॉ शितल ढाके, डॉ.सतीश, डॉ.शिवाजी सोनोने यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. हा दिवस ऍनेस्थेसिया व्यावसायिकांना देखील ओळखतो, ज्यांना अनेकदा भूलतज्ज्ञ म्हणून ओळखले जाते, जे रुग्णांना कोणतीही अस्वस्थता न अनुभवता शस्त्रक्रिया करण्यात मदत करतात.ऍनेस्थेसिया ही एक वैद्यकीय प्रक्रिया आहे जी रुग्णांना शस्त्रक्रिया, ऊतींचे नमुने काढणे (उदा. त्वचेची बायोप्सी), हृदय शस्त्रक्रिया, प्रसुती शस्त्रक्रिया, विशिष्ट तपासणी आणि निदान चाचण्यांसारख्या उपचारांदरम्यान वेदना जाणवण्यापासून प्रतिबंधित करते. हे रुग्णांना शस्त्रक्रिया करण्यास सक्षम करते ज्यामुळे त्यांचे आरोग्य आणि दीर्घ आयुष्य सुधारते. वर्ल्ड फेडरेशन ऑफ सोसायटीज ऑफ ऍनेस्थेसियोलॉजिस्ट द्वारे जागतिक भूल दिन घोषित करण्यात आला.

## रक्तातील ग्लुकोजची पातळी

जर तुम्ही तुमच्या रक्तातील ग्लुकोजची पातळी ग्लुकोमीटरवर तपासली आणि सामान्य श्रेणीपेक्षा कमी असल्याचे आढळले, तर पुढील पायरी काय आहे? पातळी वाढवण्यासाठी चॉकलेटचा तुकडा खाणे पुरेसे आहे का? एक ग्लास फळांचा रस पिणे चांगली कल्पना आहे का? डॉ. आकाश जाधव, डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय सांगतात जेव्हा तुम्हाला कमी रक्तातील ग्लुकोज किंवा हायपोग्लायसेमियाची लक्षणे जाणवतात तेव्हा काय करावे.

**हायपोग्लाइसेमिया म्हणजे काय?** हायपोग्लाइसेमिया किंवा कमी रक्तातील ग्लुकोजची पातळी ही अशी स्थिती आहे जेव्हा तुमच्या रक्तातील ग्लुकोजची पातळी ७० एमजी/डीएल पेक्षा कमी होते. असे काही वेळा असतात जेव्हा मधुमेही जे औषधे घेत असतात किंवा इन्सुलिन घेतात, जेवण वगळतात, कमी खातात किंवा नेहमीपेक्षा जास्त व्यायाम करतात. यामुळे रक्तातील साखरेची पातळी अचानक कमी होऊ शकते किंवा हायपोग्लायसेमियाची लक्षणे दिसू शकतात. अशा परिस्थितीत डॉक्टरांशी चर्चा केली पाहीजे.

**सामान्य चिन्हे, लक्षणे –** डळमळीत वाटणे,गोंधळ – घाम येणे, चिंताग्रस्त किंवा चिंताग्रस्त असणे, मूड स्विंग्स, चक्कर येणे, अशक्तपणा जाणवणे,डोकेदुखी, मुंग्या येणे किंवा सुन्न होणे. हायपोग्लाइसेमियाची लक्षणे दिसण्याची वाट पाहू नका.

# गोदावरीमध्ये वाचना प्रेरणादिनानिमित्त कार्यक्रम

## माजी राष्ट्रपती डॉ. ए पी. जे. अब्दुल कलाम यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

### विधी महाविद्यालय

**जळगाव – वाचन प्रेरणा दिवस'' हा साजरा करण्यात येतो. याच निमीत्त डॉ. उल्हास पाटील विधी महाविद्यालयात ग्रंथालयाच्या वतीने चर्चासत्र आयोजित करण्यात आले.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड किर्ती पाटील तर प्रमुख अतिथी म्हणून ॲड डॉ. नयना महाजन या उपस्थीत होत्या.मान्यवरांनी यावेळी डॉ. ए पी जे कलाम यांचा जिवनपट चित्रफितीच्या माध्यमातून उलगडून सांगत डॉ. ए पी जे कलाम यांच्या व्यक्तीमत्वातून खुप काही शिकण्यासारखे असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.अनुजा पाटील तर आभार डॉ. ललीता सपकाळे यांनी मानले यशस्वीतेसाठी ग्रंथपाल प्रा.



इश्वर राणे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा–यांनी परिश्रम घेतले. विधी महाविद्यालयाचे विदयार्थी उपस्थीत होते.

### वुमन्स कॉलेज

डॉ. वर्षा पाटील वुमन्स कॉलेज ऑफ होम सायन्स महाविद्यालयातील ग्रंथालयात वाचन प्रेरणा दिन ' उत्साहात साजरा करण्यात आला.

त्याप्रसंगी डॉ. उल्हास पाटील विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. नयना झोपे यांच्या हस्ते डॉ.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले व डॉ.नयना झोपे मॅडम यांचे स्वागत मीनल राणे मॅडम यांनी केले डॉ.अब्दुल कलाम यांच्या जयंतीला वाचन प्रेरणा दिन का साजरा करण्यात येतो याविषयी बहुमोल मार्गदर्शन डॉ. नयना



झोपे यांनी केले. कार्यक्रमाचे सर्व आखणी ग्रंथपाल सौ.कविता राहुल भोरटके यांनी केली.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्राचार्य कविता देशमुख, प्रशासकीय अधिकारी मीनल राणे, एनएसएस कॉर्डिनेटर जयश्री कुलकर्णी, प्रा. तेजस्विनी पाटील , प्रा.रेणुका सूर्यवंशी, प्रा. समृद्धी सराफ यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

### विधानसभा निवडणूक २०२४

## जळगाव जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू

**जळगाव – मा.भारत निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्र राज्य विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम घोषित केलेला आहे. आयोगाकडून निवडणूक कार्यक्रमाची घोषणा केल्यापासून म्हणजेच तत्क्षणी विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी आदर्श आचारसंहिता लागू झालेली आहे.**

जळगांव जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघांच्या निवडणूकीचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

**अ.क्र तपशील तारीख, वेळ व ठिकाण**

१. नामनिर्देशन पत्र दाखल करणे. दिनांक – २२.१०.२०२४ ते दिनांक – २९.१०.२०२४, वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० (सार्वजनिक सुटीचे दिवस वगळता)

२. नामनिर्देशन पत्र मिळणे वरील कालावधीत व वेळेत तसेच वर नमूद केलेले ठिकाणी

भारत निर्वाचन आयोग

३. नामनिर्देशन पत्रांची छाननी दिनांक – ३०.१०.२०२४ सकाळी ११.०० वाजेपासुन निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय

४. उमेदवारी मागे घेण्याचा शेवटचा दिनांक दिनांक. ०४.११.२०२४ (दुपारी ३.०० पर्यंत) निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय

५. मतदानाचा दिनांक व वेळ दिनांक – २०.११.२०२४

६. मतमोजणीचा दिनांक दिनांक – २३.११.२०२४

७. निवडणूक प्रक्रीया पुर्ण होण्याचा दिनांक दिनांक – २५.११. २०२४

# महानगरपालिकेच्या बसडेपो बांधकामाचे भूमिपूजन

**जळगाव– केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री ई– बस सेवेंतर्गत ५० बसेस तसेच महानगरपालिकेच्या हद्दीत मेहरूण येथील ग. क्र. ४१८, ४१९ येथील महानगरपालिका मालकीच्या जागेत बस डेपो बांधकाम ज्यात वाहनतळ क्षेत्र,पुरक वास्तु, कुंपण भित, सांडपाणी व्यवस्था, विद्युत कामे, अग्निशमन संबंधीत अनुषांगिक कामाचे भूमिपूजन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.**

यावेळी खा.स्मिता वाघ, आ. सुरेश ( राजू मामा ) भोळे, आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे, यांच्यासह महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते.

**शहराला मिळणार ५० बस**

देशातील १६९ महत्वांच्या शहरामध्ये व राज्यामधील २३ शहरांमध्ये जळगाव शहराचा प्रधानमंत्री ई– बस सेवा योजनेत समावेशकरण्यात आला आहे. यात प्रामुख्याने १२ मी. लांब स्टॅण्डर्ड बसेस २४

*** प्रधानमंत्री ई– बस सेवेंतर्गत मिळणार ५० बस;**

*** देशातील १६९ शहरात जळगावचा समावेश**



नग, ९ मी. लांब मिडी बसेस ६ नग, ६ मी. लांब मिनी बसेस २० नग अशा एकूण ५० बस मिळणार आहेत.

स्थापत्य निगडीत या कामांचा समावेश

प्रस्तावीत कामात वाहनतळ क्षेत्र,पुरक वास्तु, कुंपण भित, सांडपाणी व्यवस्था, विद्युत कामे, अग्निशमन संबंधीत अनुषांगिक कामे असणार आहेत. यासाठी अंदाजपत्रकीय रक्कम ९ कोटी ९७ लाख एवढी असणार आहे.

विद्युत विषयक प्रस्तावित कामे

३३ के. व्ही. विद्युत वाहिनी उभारणी (महावितरण) करणे यासाठी अंदाजपत्रकीय रक्कम ७.७५ कोटी असणार आहे. एल. टी. लाईन रोहित्र व इतर अनुषांगिक कामे (महानगरपालिका)अंदाजपत्रकीय रक्कम १.९३ कोटी रुपये आहे.

रामदास कॉलनी येथील ओपन स्पेस विकसीत करण्याच्या कामाचेही पालकमंत्री यांनी केले भूमिपूजन.